स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे विद्याशाखा अंतर्गत समाजशास्त्र विषयाच्या पीएच.डी. पदविसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा आराखडा

SYNOPSIS

"कोरडवाहु शेतक-यांची सामाजिक स्थिती : एकसमाजशास्त्रीय अध्ययन "(विशेष संदर्भ :–जालना जिल्हा)

संशोधक

प्रा.भाउसाहेब दादाराव साबळे

मार्गदर्शक

प्रा. डॉ. कांबळे बी.एम.

सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग प्रमुख,

यशवंत महाविद्याल नांदेड.

प्रस्तावना :–

भारत हा कृषिप्रधान देश आहे. प्राचीन काळापासून भारतीय लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हा राहिलेला आहे. भारतातीलच नव्हे तर जगातील 2/3 लोकांचा व्यवसाय शेती हाच आहे. भारताच्या आर्थिक विकासात कृषीचा महत्वपूर्ण वाटा असून एकुण रोजगाराच्या 52 % रोजगार शेतीतून मिळतो. 2011 च्या जनगणनेनुसार 68.84 %लोक ग्रामीण भागात राहत असून त्यांचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये प्राथमिक क्षेत्र म्हणून शेती व्यवसायाचा विचार केला जातो. महात्मा गांधीनी भारतीय शेती ही भारतीय लोकांच्या उपजिविकेचे साधन असल्यामुळे शेतीस भारताचा आत्मा असे म्हटले आहे.

भारताने 1991 साली खजगीकरण उदारीकरण आणि जागतीकीकरणच्या धोरणांचा अवलंब केला. त्याचा परिणाम भारतीय शेती व शेतीसंबंधीत व्यवसायांवर झाला. भारतीय शेती ही प्रामुख्याने निसर्गावर अवलंबुन असून सिंचनाचे प्रमाण अत्यल्प असल्याचे दिसून येते. शेतीच्या ज्या प्रकारांमध्ये वर्षातुन जास्तीत जास्त दोन वेळा पीक घेता येते त्या शेती प्रकाराला कोरडवाहु शेती असे म्हणतात. ज्या प्रदेशात पावसाचे प्रमण कमी आहे किंवा सिंचनाच्या सुविधा अत्यल्प हंगामी स्वरूपाच्या आहेत त्या प्रदेशातील शेती कोरडवाहु शेती म्हणून ओळखली जाते. जेथे पावसाचे प्रमाण 50 से.मी. किंवा त्यापेक्षा कमी असते अशा प्रदेशातील शेतीला कोरडवाहु शेती असे म्हणतात. चवथ्या पंचवार्षिक योजनेच्या (1969–1974) व्याख्ये प्रमाणे कोरडवाहु शेती अशा क्षेत्राला म्हणतात जेथे एका वर्षात सरासरी 375 ते 1125 मिली लिटर पासून पडतो. ज्या क्षेत्रात 375 मिली पेक्षा कमी पाउस पडतो त्याला रूक्ष किंवा वाळवंटी क्षेत्र असे म्हणतात.

कोरडवाहु शेती हा प्रामुख्याने शेतीच्या इतर प्रकारांपेक्षा कमी प्रतिष्ठेचा प्रकार असून या शेतीमध्ये उत्पन्नाची कोणतीही निश्चितता नसते. दर वर्षी कोरडा किंवा ओला दुष्काळ हे कोरडवाहु शेती समोरील महत्वाचे आव्हान असते. कोरडवाहु शेतीमध्ये प्रामुख्याने ज्वारी, बाजरी, कापूस, उडीद, मुग, सोयाबीन, तूर काही प्रमाणात हरभरा इत्यादी पीके घेता येतात निसर्गाची कृपा लाभली तर ही पिके येतात अन्यथा कोरडवाहू शेती तोटयात जाते. परिणामी शेतक-यासमोर अनेक प्रश्न निर्माण होउन शेतकरी कर्जबाजरी होतो.

शासनाने कोरडवाहू शेती सुधारणा अभियानामार्फत कोरडवाहु शेती सुधारणाना प्रोत्साहान दिले आहे. देशातील सिंचनाची स्थिती पाहता 45 % क्षेत्र सिंचनाखाली आहे महाराष्ट्रामध्ये हेच प्रमाण 18% आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा या विभागाचा विचार केल्यास सिंचनाबाबत स्थिती अधिकच बिकट आहे. जालना जिल्हयात सिंचन सुविधा ही नाममात्र स्वरूपात असून कोरडवाहु क्षेत्र मोठया प्रमाणावर आहे. त्यामुळे या भागात शैक्षणिक मागासलेपणा, शेतकरी आत्महत्या, वैयक्तीक व कौटुंबिक विघटन, ग्रामीण– नागरी स्थलांतर, ग्रामीण दारिद्रय, सामाजिक–आर्थिक विषमता इत्यादी प्रश्नांनी गंभीर स्वरूप धारण केले आहे.

कोरडवाहु शेती ही निसर्गावर अवलंबुन असल्यामुळे त्यांच्या उत्पन्नाचे प्रमाण कमी आहे. त्याचा परिणाम त्यांच्या परिस्थितीवर होत आहे. जालना जिल्हयातील बहुतांश शेतकरी अल्पभुधारक असुन त्यांच्याकडे शेती मशागतीची पुरेशी साधनेही उपलब्ध नाहीत. तसेच कोरडवाहु शेतक-यांच्या विकासाकडे वेळोवेळी दुर्लक्ष झाल्यामुळे येथील शेतकरी सामाजिक आर्थिक दृष्टया हवालदिल झाला आहे. त्याला आपल्या दैनंदिन गरजा ही पूर्णपणे भागवता येत नाही. देशाचा पोशिंदा बळीराजा बिकट परिस्थितीने ग्रासला आहे. या परिस्थितीमुळे त्याला त्याच्या जीवनाचे मुल्य वाटत नसुन तो आत्महत्येकडे प्रवृत्त होत आहे.

संशोधनाची उद्दिष्टे (Objective of Research):

उद्दिष्टानुरूप संशोधन हे संशोधन कार्याला गती देण्यासाठी महत्वपूर्ण असते. सदरील संशोधनात पूढील उद्दिष्टांवर लक्ष केंद्रीत केले आहे.

1) भारतातील कोरडवाहु शेतक-यांचे स्वरूप व तीव्रता स्पष्ट करणे.

2) कोरडवाहु शेतक-यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे.

3) कोरडवाहु शेतक-यांच्या जीवनातील कौंटुबिक, सामाजिक व आर्थिक समस्यांची कारणे शोधणे.

4) कोरडवाहु शेतक-यांचे उत्पन्न, खर्च व कर्जबाजारीपणा इत्यादी घटकाचे अध्ययन करणे.

5) कोरडवाहु शेतकरी आणि आत्महत्या यांचा परस्परसंबंध तपासणे.

6) कोरडवाहु शेतक-यांच्या समस्यांवर उपाय सुचविणे.

7) कोरडवाहु शेती सुधारण्याच्या अनुषंगाने असणा-या शासकीय योजनंची माहिती मिळविणे.

8) कोरडवाहु शेतक-यांची शैक्षणिक स्थिती अभ्यासणे.

9) कोरडवाहु शेतक-यांच्या धार्मिक व सांस्कृतिक स्थितीचे अध्ययन करणे.

10)कोरडवाहु शेतक-यांच्या राजकीय सहभागाची स्थिती अभ्यासणे.

गृहितकृत्ये (Hypothesis of Research) :–

सामाजिक संशोधनात गृहितकृत्यांना विशेष महत्व असते. सुयोग्य गृहितकृत्यांच्या निर्मितीतुन संशोधनाचा मार्ग सुलभ होण्यास मदत होते. संशोधनाची दिशा निश्चित होते. संशोधन समस्येच्या शास्त्रीय पडताळीसाठी संशोधकाने पुढील गृहितकृत्ये निर्माण केली आहे.

1) कोरडवाहु शेतक-यांची आर्थिक व सामाजिक स्थिती दयनीय आहे.

2) अल्पभूधारक शेतक-यांमध्ये कोरडवाहू शेतीचे प्रमाण अधिक आहे.

3) कोरडवाहू शेतक-यांचे उत्पन्न वाढविणे आव्हानात्मकबाब आहे.

4) कोरडवाहु शेतक-यांमध्ये दारिद्रय व कर्जबाजारीपणा आढळतो.

5) कोरडवाहु शेतक-यांमध्ये आत्महत्याचे प्रमाण अधिक आहे.

6) शासकीय योजनांचा लाभ कोरडवाहु शेतक-यांना फारसा होत नाही.

7) कोरडवाहु शेतकरी अल्प उत्पादनामुळे उच्च शिक्षणापासुन वंचित आहे.

8) ग्रामपातळीवरील निर्णय प्रक्रीयेत कोरडवाहु शेतक-यांचे फारसे सहभागीत्व आढळत नाही.

9) कोरडवाहु शेतक-यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीच्या दुर्दशेला अज्ञान,प्रथा,परंपरा व अंधश्रध्दा जबाबदार आहे.

संशोधनाचे महत्व :–

शास्त्रीय स्वरूपामध्ये कोणत्याही संशोधनाचे सैध्दांतिक व व्यवहारिक अशा दोन प्रकारे महत्व असते.

1) सैध्दांतिक महत्व :

प्रस्तुत संशोधनामध्ये जालना जिल्हायातील कोरडवाहु शेतक-यांच्या सामाजिक स्थितीचे समाजशास्त्रीय संशोधन करण्यात येणार असुन सैध्दांतिक पातळीवर ही समस्या माहित करून घेणे, कार्यकारणभाव शोधने, संकल्पंनाची निर्मिती करणे
इत्यादी दृष्टीने हे संशोधन महत्वपूर्ण ठरणार आहे.

2) व्यवहारिक महत्व :

कोरडवाहु शेतक-यांची सामाजिक स्थितीचे समाजशास्त्रीय संशोधन करण्यात येणार असुन त्यामुळे कोरडवाहु शेतक-यांची वास्तविक स्थिती, त्यांच्या प्रमुख समस्या जाणुन घेण्यास महत्वपूर्ण ठरेल. तसेच शेतक-यांसदंर्भात कृषी धोरण, कृषी विकास कार्यक्रम, पंचवार्षिक योजना कार्यान्वयीत करण्यासाठी प्रशासनास मार्गदर्शक ठरेल.

संशोधन आराखडा (**Research Design**)

कोरडवाहु शेतक-यांच्यासामाजिक स्थितीचे विश्लेषण करण्यासाठी ही समस्या सोडविण्याच्या उद्देष्याने उपाययोजनात्मक संशोधनासाठी या संशोधनामध्ये अन्वेषणात्मक संशोधन आराखडा उपयोगात आणावयाचा आहे.

संशोधनाचे कार्यक्षेत्र व व्याप्ती :–

जालना जिल्ह्यातील अंबड, घनसांवगी, परतुर, मंठा, जालना, बदनापुर, भोकरदन व जाफ्राबाद या आठ तालुक्यातील कोरडवाहु शेतक-यांच्या सामाजिक स्थितीचे अध्यन करण्याचे निश्चित केले आहे.

नमुना निवड

जालना जिल्ह्यातील कोरडवाहु शेतक-यांच्या अध्ययनासाठी 320 एककांची अंबड, घनसांवगी, परतुर, मंठा, जालना, बदनापूर, भोकरदन व जाफ्राबाद या आठ तालुक्यातुन प्रत्येकी 40 एकक तर तालुकानिहाय कोरडवाहु शेतक-यांच्या अध्ययनासाठी यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने सिमांत,लहान,मध्यम व मोठया भुधारकांना सम प्रमाणात स्थान देण्यात येईल.

संशोधन पध्दती(**Research Method**)

सदरील अध्ययन कोरडवाहु शेतक-यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, कौटुंबिक, सांस्कृतिक तसेच व्यावसायिक पैलुंचे ज्ञान प्राप्त करून त्यावर उपाय योजना सुचविण्यासाठी या संशोधनामध्ये सामाजिकसर्वेक्षण(**Social Survey**) संशोधन पद्धतीचा अवलंब केला जाईल.

तथ्य संकलन(**Data Collection**):

सदरील संशोधनात तथ्य संकलनासाठी खालील दोन स्त्रोतांचा उपयोग करण्यात येणार आहे.

(अ) प्राथमिक स्त्रोत :

संशोधनाच्या माहिती संकलनासाठी मुलाखतअनुसुची व निरीक्षण या दोन तंत्रांचा उपयोग केला जाईल.

(ब) दुय्यम स्त्रोत :–

या स्त्रोतात कोरडवाहु शेतक-यांशी संबंधित विविधसंशोधने, संदर्भग्रंथ, मासिके, पाक्षिके, साप्ताहिक, वर्तमानपत्र, स्वयंसेवी व शासकीय संस्थांचे अहवाल व विविध वेबसाईटवरील माहितीचा आधार घेण्यात येईल.

तथ्य विश्लेषण (Data Processing)

तथ्य संकलनानंतर विश्लेषणासाठी खालील बाबी उपयोगात आणण्यात येतील.

अ) विश्लेषण :–**Analytical.**

ब) आलेख पध्दत :–**Graphics.**

क) संगणकीकरण :–**Computerization.**

ड) तक्ता :–**Chart.**

प्रकरणाची योजना (Chapter Scheme) :-

1) प्रस्तावना
2) संशोधन पद्धती व संबंधित साहित्याचा आढावा.
3) कोरडवाहु शेतक-यांची कौटुंबिक स्थिती.
4) कोरडवाहु शेतक-यांचीसामाजिक व आर्थिक–व्यावसायिक स्थिती.
5) कोरडवाहु शेतक-यांची धार्मिक व सांस्कृतिक स्थिती.
6) कोरडवाहु शेतक-यांची शैक्षणिक व राजकीय स्थिती
7) निष्कर्ष व शिफारसी

संदर्भ सुची (References):-

1)Desai A.R. (1983) - Rural India in Transition
Popular Book Dept. Bombay-7
2) Good & Hatt (1952) - Methods In Social Research
Megraw Hill Publication Tokyo.
3) Young P.V. (1960) - Scientific Social survey And
Research Asia Publishing
House Bombay.
4) डॉ. आगलावे प्रदिप(2002) – संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे.
विद्या प्रकाशन नागपुर.
5) आहुजा राम (2000) – सामाजिक समस्याएँ
रावत पब्लीकेशन दिल्ली.
6) डॉ. शर्मा व्हि.प्रकाश(2004) – भारतीय समाज मुद्दे और समस्याएँ
पंचशील प्रकाशन नागपुर.
7) प्रा. घाटोळे रा.ना.(2000) – समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पद्धती
मंगेश प्रकाशन नागपुर.
8) डॉ. बोधनकर/आलोनी (1999) – सामाजिक संशोधन पद्धती
श्री. साईनाथ प्रकाशन नागपुर.
9) कविमंडन विजय (2012) – कृषी आणि ग्रामीण अर्थशास्त्र
10) देसाई ए.आर. – भारतीय ग्रामीण समाजशास्त्र
रावत पब्लीकेशन जयपुर.
11) **http://en.wikipedia.org/wixi/jalna district.**

संशोधक मार्गदर्शक

प्रा.साबळे बी.डीप्रा.डॉ.कांबळे बी.एम.